# पोलीस अधिक्षक कार्यालय, पालघर
# Office of Superintendent Of Police, Palghar
**Phone No. 02525-297026, Mob No. 8669604100**
**Address: Central Administrative Builing, Bidco Road, Palghar(W.)- 401404**
**E-mail : sp.palghar@mahapolice.gov.in**

**Reference No** पोअ/पालघर/आस्था–१/सेवा जेष्ठता यादी/पोशि,पोना,पोहवा/ /२०१९, **Date: /09 /2019**

विषय :– पोलीस शिपाई ते पोलीस हवालदार या पदांना पदोन्नती देण्यांबाबतची तात्पुरती सेवाजेष्ठता यादी. प्रसिध्दीबाबत.. ..

-------------000---------------

पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस हवालदार/पोलीस नाईक/पोलीस शिपाई यांची सन–२०१९ ची तात्पुरती सेवाजेष्ठता यादी www. palgharpolice. gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत आली आहे. सदर सेवाजेष्ठता यादी सर्व विभागीय पोलीस उप अधिकारी/प्रभारी अधिकारी पो.स्टे./शाखा/पो. मुख्यालय पालघर यांना त्यांच्या ई मेल आयडीवर पाठविण्यांत आली आहे. सदरचे पत्र दररोज सर्व पोलीस कर्मचा–यांना ५ दिवस हजेरीवर वाचुन दाखवावे व यादीतील कर्मचा–यांचे स्थान निश्चिती सर्व पोलीस कर्मचा–यांच्या निदर्शनास आणावी. तसेच सेवाजेष्ठता यादया वेबसाईटवरुन डाउनलोड करुन पोलीस स्टेशनच्या नोटीस बोर्डावर लावून सर्व कर्मचा–यांच्या निदर्शनास आणुन दयावे.

सर्व पोलीस कर्मचारी यांनी सदर सेवाजेष्ठता सुचीमध्ये नमुद केलेली त्यांची जात/प्रवर्ग/जन्म तारीख/भरती तारीख/पदोन्नतीच्या तारखा बरोबर आहेत अगर कसे तसेच कर्मचारी जिल्हा बाहेर बदलुन गेला असल्यास त्याबाबतची खात्री करावी. त्यामध्ये काही उणीवा/चुका असल्यास अगर स्थान निश्चितीबाबत अडचण असेल व त्याबाबतचे आक्षेप लेखी स्वरुपात तात्काळ संबंधित प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे यांचेकडे सादर करुन, संबंधित कर्मचारी यांचे आपेक्ष योग्य आहे अगर कसे याबाबत आपले अभिप्रायासह सदर आपेक्ष अर्ज दि. १९/०९/२०१९ पावेतो इकडील कार्यालयास सादर करावेत.

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई पोमसं/६/२२/मॅट केस/होळंबे/३०९/२०१३ दि. २६/१२/२०१८ अन्वये राज्य राखीव पोलीस बलातुन जिल्हा पोलीस दलात जिल्हा बदली करण्याकरिता रा. रा. पो. बलातील सेवेची अट व जिल्हा पोलीस दलात बदलून गेल्यानंतर निश्चित करावयाच्या सेवाज्येष्ठते संबंधीतातील शासन तरतुदीमध्ये सुधारणा करणेबाबत प्राप्त प्रस्तावावर शासन शुध्दीपत्रक, गृह विभाग दि.२१/१०/२०१६ मधील परिच्छेद क. २ मधील अट क्र.२ रद्द करुन, **महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक–पीएमएन ०३१४/२०३/प्र. क्र. ६८/पोल–५ ब, दिनांक १०/१२/२०१८ अन्वये** राज्य राखीव पोलीस बलातुन जिल्हा पोलीस दलात/इतर घटकात विनंतीवरुन बदलून जाण्या–या कर्मचां–याची सेवा जेष्ठता निश्चित करताना. संबंधीत राज्य राखीव पोलीस बलाच्या कर्मचा–यांचे भरती वर्षे प्रमाण तानले जाईल व राज्य राखीव पोलीस बलातील बदलुन जाणारा कर्मचारी ज्या वर्षी राज्य राखीव पोलीस बलात भरती झाला असेल त्या वर्षातील जिल्हा पोलीस दलात भरती झालेल्या सर्व कर्मचा–यांच्या सर्वात शेवटी त्याला सेवाजष्ठता दिली जाईल व त्या वर्षात त्याच्या प्रवर्गातील कर्मचारी ज्या पदावर कार्यरत आहेत. त्या पदावरच तो नियुक्तीस पात्र राहिल. असे निर्देशित केले असुन, त्यानुसार सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करण्यांत आली आहे.

Scanned by CamScanner

सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी यांनी त्यांचे नेमणुकीतील पोलीस शिपाई/पोलीस नाईक/पोलीस हवालदार यांचे नांव सेवाजेष्ठता यादीत असल्याबाबत खात्री करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र दि. १९/०९/२०१९ रोजी न चुकता इकडील कार्यालयात हस्ते सादर करावे. तसेच ज्या पोलीस शिपाई/पोलीस नाईक/पोलीस हवालदार यांचे नांव सेवाजेष्ठता यादीत समाविष्ठ नाही. अशा कर्मचा—यांची नांवे तात्काळ इकडील कार्यालयास सादर करावीत.

सेवाजेष्ठता यादीत प्रसिध्द केलेल्या कर्मचा—यांपैकी एखादा कर्मचारी आंतर जिल्हा बदली/सेवेतुन कमी/बडतर्फ/सक्तीने सेवानिवृत्त/मयत झाले असल्यास त्याबाबत माहिती संबंधित प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयात उलट टपाली सादर करावी. त्यानंतर सदर माहितीचे आधारे सदर माहिती सेवाजेष्ठता यादीत अदयावत करुन संबधीत कर्मचा—यांची सेवाजेष्ठता यादीतील स्थान निश्चित करण्यांत येईल.यांची सर्व संबंधित पोलीस कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.तसेच दि. १९/०९/२०१९ रोजीनंतर प्राप्त झालेले कोणतेही अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. यांची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

सदर सेवाजेष्ठता यादी तात्पुरत्या स्वरुपाची असुन, संबंधित पोलीस कर्मचारी यांनी यांच्याकडून प्राप्त झालेल्या आक्षेपानुसार सदर यादीत आवश्यक दुरुस्ती करुन, त्याबाबत सुधारीत सेवाजेष्ठता यादी www. palgharpolice. gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल.

(गौरव सिंग)
पोलीस अधीक्षक, पालघर

प्रति,

सर्व प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे जिल्हा पालघर
सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी जिल्हा पालघर
प्रभारी अधिकारी सर्व शाखा जिल्हा पालघर
राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय पालघर

Scanned by CamScanner